MHKO100002012011

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०११

सरस्वती शिवसिंग हजारे वगैरे.
// विरुध्द //
सुभाष हरीसिंग शिलेदार.

## निशाणी क्र. १०० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१०६ वर त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने असे शाबीत केले काय की, त्यांच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | आहे. |
| २. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने आहे ? | आहे. |
| ३. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | आहे. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

### दावा मिळकतींचे वर्णन-

३. मौजे हेब्बाळ क।। नुल, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथील भुमापन गट क्र. ३९४ क्षेत्र ०० हेक्टर ११ आर आकार ०० रुपये २२ पैसेची मिळकत (यापुढे सदर मिळकतीस "दावा मिळकत" म्हणून संबोधण्यात येईल) ही या अर्जाचा विषय आहे.

४. वादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.१०२,१०३ व १०९ येथे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेतः-

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | दिनांक ११/०२/२०१० रोजीचे मृत्यूपत्र. |
| ०२. | डायरी क्र.११२० चा उतारा. |
| ०३. | गट क्र.३९४ चा ७/१२ उतारा. |
| ०४. | फेरफार क्र.४२६४ चे फेरफार पत्रक. |
| ०५. | दावा मिळकतीवरील बांधकामाबाबतचे फोटो व फोटोची पावती. |
| ०६. | संजीवनी सुरतसिंह रजपुत यांचे प्रतिज्ञापत्र. |
| ०८. | दिनांक ३०/०८/२००८ रोजीचा वारस नोंद होणेबाबतचा अर्ज. |
| ०९. | फेरफार क्र.२८०७ चे फेरफार पत्रक. |
| १०. | दिनांक १३/०१/२०१० रोजीचे वारसाचे ॲफीडेव्हीट. |
| ११. | खाते क्र.१६६१ चा ८-अ उतारा. |
| १२. | गट क्र.३९४ सन २०१८-१९ सालचा ७/१२ उतारा. |
| १३. | गट क्र.३९१ सन २०१८-१९ सालचा ७/१२ उतारा. |
| १४. | दिनांक ०७/०१/२०११ रोजीची कुळ वहिवाट/एस.आर/४४/२०२१ मधील निकाली समज. |
| १५. | दस्त क्र.२९४/२०२१ मधील दस्त. |
| १६. | फेरफार क्र.४३९२ चे फेरफार पत्रक. |
| १७. | महावितरण, गडहिंग्लज यांचेकडील पत्र व त्यासोबतची कागदपत्रे. |
| १८. | खाते क्र.१९९५ चा ८-अ उतारा. |

५. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ नि.११३ सोबत खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | फेरफार क्र.११२०, ४२६४ चे उतारे. |
| ०२. | दिनांक १३/०३/२०२० रोजीची प्रभारी मंडळ अधिकारी भाग दुंडगे यांचेकडील मं.अ.तक्रार/एसआर/१२/२०१९ मधील निकाली समज व निकालपत्र. |
| ०३. | दिनांक २०/०६/२०२२ रोजीची उपविभागीय अधिकारी कार्यालय यांचेकडील क्र./आरटीएस/अपिल/४३/२०२० मधील निकाली समज व निकालपत्र. |
| ०४. | खाते क्र.२०२८, ११९५, २०२९, ९५८, ९७१ चे ८-अ उतारे. |
| ०५. | गट क्र.१०३, २८५, २९३, ३९१, ३९४, ३०६/१०, ३९२, ४०६, ४०८ चे ७/१२ उतारे. |
| ०६. | किरकोळ दिवाणी अपील क्र.६६/२०१४ मधील न्यायनिर्णयाची प्रत. |

| | |
|---|---|
| ०७. | किरकोळ दिवाणी अपील क्र.६६/२०१४ मधील हुकुमनामाची प्रत. |
| ०८. | दिनांक ०२/१२/१९४७ रोजीचे दत्तकपत्र. |
| ०९. | दिनांक ११/०२/२०१० रोजीचे मृत्युपत्र. |

**प्रश्न क्रमांक १ ते ३ करिताः -**

६. वरील सर्व प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचेवर एकत्रीतपणे चर्चा करण्यात येत आहे. वादींच्या मुळ दाव्यातील व प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांचे वडील हरिसिंग असुन ते एकमेकांचे सख्खे भाऊ बहीणी आहेत. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत असुन त्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकत ही त्यांचे घराण्यातील मुळ पुरुष सहदेवसिंग आप्पासिंग रजपूत यांचे मालकीची व त्यांचे मृत्युनंतर त्यांची पत्नी शाराबाई यांचे मालकीची झाली. शाराबाई हिने हरिसिंग यास दत्तक घेतल्यानंतर दावा मिळकत त्याचे नावे झाली आणि हरिसिंग व शाराबाई यांचे मृत्युनंतर दावा मिळकतीवर त्यांचे वारस म्हणुन वादी व प्रतिवादी यांचे नाव लागले आहे.

७. याऊलट, प्रतिवादीच्या मुळ कैफियतीतील व प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादीने वादींशी असलेले भावा-बहीणीचे नातेसंबंध मान्य केलेले आहे. परंतु, दावा मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीचे कथनानुसार दावा मिळकत ही त्यांचे घराण्यातील मुळ पुरुष सहदेवसिंग आप्पासिंग रजपूत यांचे मालकीची व त्यांचे मृत्युनंतर त्यांची पत्नी शाराबाई यांचे मालकीची झाली. सहदेवसिंग व शाराबाई यांना सुलोचना ही मुलगी होती व त्यांनी हरिसिंग यास दत्तक घेतले. परंतु, शाराबाई हीने केवळ हरिसिंग याचे नाव नोंद होणेबाबत वर्दी दिलेनुसार हरिसिंग याचे नाव लागले, तथापी हरिसिंग यास एकट्याास कधीच मालकी हक्क प्राप्त झालेला नाही. तसेच, दावा मिळकत ही शाराबाई हीचे हिस्सेची असल्याने तिने त्याबाबत दिनांक ११.०२.२०१० रोजी मृत्युपत्र करुन ठेवले आणि त्यानुसार प्रतिवादी व अन्य ईसम दावा मिळकतीचे मालक झाले. वादींनी सदर मृत्युपत्र आव्हानीत करुन कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. सबब, दावा मिळकतीशी वादींचा कोणताही हक्कसंबंध नाही.

८. वादी व प्रतिवादी तर्फे दाखल दस्तऐवजांनुसार दावा मिळकत ही सहदेवसिंग आप्पासिंग रजपूत यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची होती. त्यांचे मृत्युनंतर फेरफार

क्र.११२० नुसार दावा मिळकत ही शाराबाई व हरिसिंग यांचे नावे झाली. त्यानंतर, दावा मिळकत ही फेरफार क्र. २८०७ अन्वये हरिसिंग यांचे वारस म्हणुन त्यांची आई शाराबाई, पत्नी सोनाबाई, मुली वादी व मुलगा प्रतिवादी यांचे नाव नमुद करण्यात आहे. तसेच, शाराबाई यांचे दिनांक ११/०२/२०१० रोजीचे मृत्युपत्रानुसार दावा मिळकत ही प्रतिवादी व ईतर दोन व्यक्तींच्या नावे करण्यात आली व त्याबाबत फेरफार क्र.४२६४ नोंद करण्यात आला. याशिवाय, दावा मिळकतीचे सन २०१८-१९ रोजीचे ७/१२ उताऱ्यावर वादी व प्रतिवादी यांचे नाव नमुद असुन सन २०२१-२२ रोजीचे ७/१२ उताऱ्यावर केवळ प्रतीवादी व ईतर व्यक्तींची नावे नमुद आहेत.

९. सदर वादी व प्रतिवादी यांची कथने, त्यांचेतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद आणि त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ दाखल दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी व प्रतीवादी यांचेदरम्यान असलेले नातेसंबंध दोन्ही बाजुंना मान्य आहेत. तसेच, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी त्यांचे घराण्यातील मुळ पुरुष सहदेवसिंग आप्पासिंग रजपूत यांचे मालकीचे असल्याचे देखिल दोन्ही बाजुंना मान्य आहे. वादींचे कथनाप्रमाणे दावा मिळकतीमध्ये त्यांना सहदेवसिंग यांचा दत्तक मुलगा हरिसिंग यांच्या मुली म्हणुन वारसाने हक्क व अधिकार आहे. याऊलट, प्रतिवादीचे कथनाप्रमाणे सहदेवसिंग यांची पत्नी शाराबाई हीने त्याचे हक्कात करुन दिलेल्या मृत्युपत्राने त्यास दावा मिळकतीत हक्क प्राप्त झालेले आहे.

१०. त्याबाबत, प्रस्तुत दाव्यातील निशाणी ३९ वरिल वादमुद्दे पाहता वादींनी दावा मिळकत ही वडीलोपार्जीत असुन त्यामध्ये त्यांना हिस्सा आहे का आणि प्रतिवादीने दिनांक ११/०२/२०१० रोजीचे मृत्युपत्र शाबीत केले आहे का असे मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहे. सबब, दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांनी कथन केल्याप्रमाणे त्यांना हक्क व अधिकार आहेत अथवा कसे ही बाब तर केवळ पुराव्यानिशी दाव्याच्या अंतिम निकालाचे वेळीच ठरविता येईल. त्यामुळे, याघडीला केवळ वादींनी मागणी केलेप्रमाणे प्रतिवादीने दावा मिळकतीत बांधकाम करु नये अशा स्वरुपाचा मनाई हुकुम मिळणेस वादी पात्र आहेत अथवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

११. त्यासंदर्भात वादींनी कथन केले आहे की, प्रतिवादीने दावा मिळकतीत पाया खुदाईचे काम चालू केले असुन दिनांक ०८/१०/२०२२ रोजी नवीन घराचे कामास सुरुवात

केली आहे. प्रतिवादी यांनी सदरचे बांधकाम केलेस दावा मिळकतीचे स्वरुप बदलणार असुन त्यामुळे वादीचे नुकसान होणार आहे. याऊलट, प्रतिवादीने कथन केले आहे की, वादीने यापूर्वी अशास्वरुपाचा मनाईचा अर्ज निशाणी क्र.८६ अन्वये दाखल केला होता व नंतर तो नॉट प्रेस केला. वादीने त्या अर्जातील पाया खुदाई करुन बांधकामाबाबतचे कथन व प्रस्तुत अर्जातील त्याबाबतचे कथन हे एकसारखेच व चुकीचे नमुद केले आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये बांधकामाकरीता लाखो रुपायांची गुंतवणूक केली असून प्रतिवादी यांचे दररोज हजारो रुपयांचे नुकसान होत आहे व कामगारांचा पगार प्रतिवादी यांना दयावा लागत आहे. त्यामुळे, प्रतिवादीविरुध्द मनाईचा हुकूम दिल्यास प्रतिवादीचे लाखो रुपयांचे नुकसान होणार असुन बांधकाम साहित्यांचे नुकसान प्रतिवादी यांस सोसावे लागणार आहे.

१२. वर नमुद विवेंचनानुसार दावा मिळकतीवर वादींनी वारसा हक्काने तर प्रतिवादीने मृत्युपत्राआधारे त्यांचा हक्क सांगितला आहे. सदर वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीवरील हक्क हा सबळ पुराव्यानिशी दाव्याचे अंतिम निकालाचेवेळी ठरणार आहे. याघडीला वादींनी कथन केले आहे की, प्रतिवादी हा दावा मिळकतीत बांधकाम करीत असुन दावा मिळकतीचे स्वरुप बदलू पाहत आहे. सदर बांधकाम सुरु असलेबाबत प्रतिवादीने नाकारलेले नसुन, दावा मिळकतीत बांधकामाबाबत प्रतिवादीने मान्य केले आहे. ज्याअर्थी दावा मिळकतीवर वादी अथवा प्रतिवादी यांचे हक्क निश्चित झालेले नाहीत. त्यावेळी प्रतिवादीने दावा मिळकतीवर बांधकाम केल्यास दावा मिळकतीचे स्वरुप बदलून दाव्यामध्ये गुंतागुंत वाढून वादींच्या हक्कावर बाधा निर्माण होणार आहे.

१३. वादींतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकतीमध्ये बांधकाम केल्यास दावा मिळकतीचे स्वरुप बदलणार असुन केवळ दाव्याचे निकालास वेळ लागणार असल्यामुळे मनाई हुकुम द्यावा असे करता येणार नाही. याकरीता वादींतर्फे वकीलांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या *Maharwal Khewaji Trust (Regd) Faritkot Vs. Baldev Dass, 2005 (5) ALL MR (SC) 3* या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले आहे की, न्यायालयाला केवळ दाव्याचे निकालास वेळ लागणार या कारणास्तव मिळकतीवर बांधकामास परवानगी देता येणार नाही.

१४. याऊलट, प्रतिवादीचे वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही मृत्युपत्राआधारे प्रतिवादी याचे ताब्यात असुन वादींनी सदर मृत्युपत्र आव्हानित केलेले नसल्यामुळे वादींना दावा मिळकतीबाबत मनाई हुकुम मागता येणार नाही. तसेच, दावा मिळकतीत वादी यांचा हक्क शाबीत झाल्यास सदर मिळकत ही सामाईक मालकीची असल्यामुळे सहहिस्सेदारास दुस-या सहहिस्सेदाराविरुध्द मनाई हुकुम मागता येणार नाही. तसेच, वादींनी महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवून ठेवल्या असल्यामुळे आणि वादींना प्रथमदर्शनी केस नसल्यामुळे वादीचा निशाणी क्र.५ वरील तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे, वादींस पुन्हा त्याच मागणीकरीता अर्ज दाखल करता येणार नाही. याकरीता प्रतिवादींतर्फे वकीलांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व मा. उच्च न्यायालयाच्या खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतलेला आहेः-

1. *Gorakh Mahadev Survase & ors. Vs. Narayan Balu Dhombe & ors. 2012(2) Mh.L.J.215.*

2. *Prakash S. Akotkar & ors. Vs. Mansoorkha Gulabkha & ors. (1996) AIR (Bombay) 36.*

3. *U.P. State Road Transport Corporation Vs. State of U.P. & anr. (2005) 1 ACC 51.*

4. *Sri Narain Das Vs. IIND Addl. District Judge, Moradabad and anr. (1999) AIR (Allahabad) 74.*

5. *Harcharanjit Singh Thind (Capt.) Vs. Deeksha Thind & ors. 2008(3) Mh.L.J. 587.*

6. *Shailaja Kamalakar Limaye & ors. Vs. Nilkanth Ganesh Pethe & ors. 2010(4) Mh.L.J. 160.*

7. *Arjun Singh Vs. Mohindra Kumar & ors. (1964) AIR (SC) 993.*

8. *Satyadhyan Ghosal & ors. Vs. SM. Deorajin Debi & anr. (1960) AIR (SC) 941.*

१५. प्रतिवादीतर्फे दाखल *Gorakh Mahadev Survase* या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की त्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे निरीक्षण दिले आहे की, तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी मागतेवेळी पक्षकाराने दावा मिळकतीवर त्यांचा ताबा हा शाबीत करणे आवश्यक असतो. वर नमुद विवेंचनानुसार आणि दोन्ही बाजुंच्या कथनानुसार दावा मिळकत ही प्रतिवादीचे कब्जेवहिवाटीत असलेबाबत याघडीला वाद उपस्थित केलेला नाही. प्रस्तुत अर्जान्वये केवळ सदर मिळकतीवर प्रतिवादीने बांधकाम करु नये याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे, सदर न्यायनिर्णयातील निरीक्षणे व प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये ही एकमेकांशी विसंगत असुन सदर न्यायनिर्णयांतील निरीक्षणे प्रस्तुत अर्जास लागू होत नाही.

१६. तसेच, प्रतिवादीतर्फे दाखल *Prakash S. Akotkar & ors* या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की त्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले आहे की, एक सहहिस्सेदार सदर मिळकतीमध्ये असलेल्या दुस-या सहहिस्सेदाराविरुध्द मनाई हुकुमाची मागणी मागू शकत नाही कारण एका सहहिस्सेदाराचा ताबा हा सर्व सहहिस्सेदारांसाठी समजला जातो. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीतर्फे करण्यात आलेली कथनांनुसार प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये वादींचा कोणताही हक्क अथवा अधिकार असल्याचे नाकारलेले आहे. त्यामुळे, प्रतिवादीच्या कथनानुसार दावा मिळकतीमध्ये वादी हे सहहिस्सेदार होत नाहीत. वादाकरीता प्रतिवादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद व दाखल न्यायनिर्णय विचारात घेतले असता जर वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये सहहिस्सेदार असल्यास वादींनी मागणी केलेप्रमाणे एका सहहिस्सेदाराने दावा मिळकतीमध्ये बांधकाम करुन दावा मिळकतीचे स्वरुप बदलू नये असा मनाई हुकुम देता येतो. सबब, दाखल न्यायनिर्णय व प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये ही एकमेकांशी विसंगत असुन सदर न्यायनिर्णय प्रस्तुत प्रकरणास लागू होत नाही.

१७. प्रतिवादीतर्फे दाखल *U.P. State Road Transport Corporation, Sri Narain Das, Arjun Singh* आणि *Satyadhyan Ghosal* या न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय व आलाहाबाद उच्च न्यायालय यांनी Res judicata या तत्वासंबंधत निरीक्षण केलेले आहे. त्यानुसार सदर Res judicata या तत्वाची बाधा केवळ दोन दाव्यांनाच लागू होत नसुन एकाच प्रकरणात

दाखल वेगवेगळया अर्जांनादेखील होते. प्रस्तुत दाव्यात वादींनी निशाणी क्र.५ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली होती व सदर अर्ज फेटाळण्यात आला. परंतु, सदर अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर अर्जानुसार वादींनी प्रतिवादी विरुध्द त्याने वादींना दावा मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा मनाईचा हुकुम मागितला होता. न्यायालयाने सदर आदेश निकाली काढताना दावा मिळकतीवर वादींचा ताबा नसल्याने त्यांना तसा मनाई हुकुम देता येणार नाही असे निरिक्षण नमुद केले आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादींनी प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये याकरीता मनाई हुकुमाची मागणी केली आहे. सबब, वादींचा निशाणी क्र.५ वरील अर्जातील मागणी व प्रस्तुत अर्जातील मागणी हया वेगवेगळया असुन मा. न्यायालयांनी त्याबाबत दिलेल्या निरिक्षणांनुसार Res judicata या तत्वाची बाधा प्रस्तुत अर्जास येत नाही.

१८. याव्यतिरिकत प्रतिवादीतर्फे दाखल *Harcharanjit Singh Thind* आणि *Shailaja Kamalakar Limaye* या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की त्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे निरीक्षण दिले आहे की, वादींनी त्यांच्या कथनात प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे शाबीत न केल्यास आणि न्यायालयापासुन महत्वाच्या बाबी लपवून ठेवल्यास वादींस तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी मागता येणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील वादींची कथने आणि वर नमुद विवेंचन पाहता वादींच्या कथनात प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येते. शिवाय, वादींनी प्रस्तुत अर्जाकामी पूर्वी दाखल केलेला निशाणी क्र.८६ चे अर्जाबाबत माहिती न दिल्याने वादींनी न्यायालयापासुन महत्वाची बाब लपवून ठेवली असे म्हणता येणार नाही. कारण वादींनी सदर निशाणी क्र.८६ चा अर्ज हा त्यांना चालविणेचा नाही असे त्यावर लिहून दिले होते. तसेच, वादींनी कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी हा दावा मिळतीत बांधकाम करीत आहे आणि सदर बाब प्रतिवादीने नाकारलेली नाही. सबब, वर नमुद दोन्ही न्यायनिर्णयांतील निरीक्षणे प्रस्तुत अर्जास लागू होणार नाहीत.

१९. एकंदरित, दोन्ही बाजुंतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवाद, दाखल कागदपत्रांवरुन दावा मिळकतीमध्ये वादी अथवा प्रतिवादी यांचे हक्क व अधिकार हे आव्हानित असुन याघडीला निश्चित झालेले नाहीत. अशापरिस्थितीत दावा मिळकतीत प्रतिवादी हा बांधकाम करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, वादीच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी

तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच, वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीने दावा मिळकतीवर नवीन बांधकाम केल्यास त्याचे मुळ स्वरुप बदलणार असल्यामुळे वादींचा त्यामध्ये हक्क प्रस्थापित झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादीचा दावा मिळकतीत असलेले हक्क व अधिकार हे प्रस्तुत दाव्यात आव्हानित असल्यामुळे त्याचेविरुध्द दावा मिळकतीत बांधकाम करु नये असा मनाई हुकुम दिल्यास त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून माझे मते न्यायिक समतोल हा वादींच्या लाभात आहे. सबब, मी प्रश्न क्र.१ ते ३ चे होकारार्थी उत्तर देत आहे.

**प्रश्न क्रमांक ४ करिताः**-

२०. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता वादींनी मागणी केलेप्रमाणे प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये असा मनाई हुकुम देता येईल. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादीने दावा मिळकत भुमापन गट क्र. ३९४ ज्याचे वर्णन अर्जातील परिच्छेद-अ मध्ये नमुद आहे त्यावर स्वतः अथवा त्यांचे मार्फत इतर कोणीही प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत नवीन बांधकाम करुन सदर मिळकतीचे मुळ स्वरुप बदलू नये असा त्याचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

०३. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.01.16 17:25:28 +0530

दिनांकः १६/०१/२०२३.
गडहिंग्लज.

**( एस.ए.राठोड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R.D.Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 16/01/2023 |
| Order signed by P.O. on | 16/01/2023 |
| Order uploaded on | 16/01/2023 |